# मैत्री-विहारिणी माताजी श्रीमती इलायचीदेवी गोयंका

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद



विपश्यना विशोधन विन्यास

# मैत्री-विहारिणी माताजी

श्रीमती इलायचीदेवी गोयंका

**हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद**

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मागिरी, इगतपुरी

# मैत्री-विहारिणी माताजी

पुस्तक कोडः **M53**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : सप्टेंबर 2025

**मूल्य: ₹ /-**
**Price: Rs.**

**ISBN** 978-81-990690-3-9

**प्रकाशक:**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२४०३
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४१९८, २४३५५३, २४४०७६, २४४०८६,
८४८४८३४८३७, ८४८४८३७८३५,
८४८४८३९८३७, ८४८४८३१८३५,
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# मैत्री-विहारिणी माताजी

## अनुक्रमणिका


**प्रास्तविक........................................................................7**

**प्रस्तावना : वहिनींची सहनशीलता.....................11**

- इलायची देवी (इला) अग्रवाल.................................11

**मंगल दीप!................................................................21**

**शुभ-संदेश...................................................................22**


### माताजींची पत्रे आणि गुरुजींचे उपदेश


माताजींच्या काही पत्रांचा सारांश.........................................25

**गुरुजींचे उपदेश.........................................................30**

१. धर्म जागृत राहो!.................................................................30

२. तुमच्याद्वारे महिलांचे कल्याण होईल...........................31

३. धर्म-चेतना जागृत राहो!.......................................................33

४. धर्म सदैव रक्षण करेल..........................................................35

५. आपली साधना मजबूत करा................................................36

६. अनित्यबोध पुष्ट होवो!.........................................................37

७. मनाची उदासीनतादेखील अनित्य आहे.......................41

८. चिंता दूर होवोत!...................................................................42

९. प्रेरणेचे दोन शब्द....................................................................44

१०. धर्म-प्रज्ञा जागृत राहो!........................................................46

## धर्मयानाचे दुसरे चक्र - साधकांच्या लेखणीतून


१. महापुरुषाची महान सहधर्मचारिणी.............................51

- डॉ. सावित्री व्यास.............................51

२. कुशल गृहिणी.............................55

- बीना अग्रवाल.............................55

3. मी तेच करीन जे हे करतात.............................57

- सज्जनबाई धारीवाल.............................57

४. धर्माप्रति अतूट श्रद्धा आणि विश्वास.............................64

- इंदिरा ब्रह्मभट.............................64

५. सजगतेची आणि समतेची मूर्ती.............................70

- इला अग्रवाल.............................70

६. विपरीत परिस्थितीतही धैर्य सोडले नाही.............................73

- एक साधिका.............................73

७. भावुक स्मरण.............................77

- कन्या शांती शाह.............................77

८. समाधानी माताजी.............................78

- कौशल्याबेन नटवरलाल पारिख.............................78

९. करुणा-मैत्रीचे भांडार.............................81

- कमला आणि काश्यप धर्मदर्शी.............................81

१०. किती सालस आहेत माताजी!.............................85

- रंजन शहा.............................85

११. माताजींचे योग्य मार्गदर्शन.............................86

- श्रीमती मधुबेन सावला.............................86

१२. आपला वेळ धर्म-कार्यात लावा.................................89
- सुनीता जैन.................................89

१३. काही आठवणी (पूज्य माताजींशी संबंधित)...........91
- कांता खद्दरिया.................................91

१४. प्रगतीसाठी सेवा द्या.................................93
- पुष्पा माखरिया.................................93

१५. परिवाराकडे दुर्लक्ष नको.................................94
- सुधा आणि मोहिनी दलाल.................................94

१६. तुम्हाला पुष्कळ पुत्र घडवायचे आहेत.......................95
- श्रीमती बीना मेहरोत्रा.................................95

१७. धर्म-दाम्पत्य.................................97
- वीणा गांधी.................................97

१८. पूज्य गुरुजी-माताजींच्या सान्निध्यात धर्मयात्रा ....98
- इला अग्रवाल.................................98

१९. एका क्षणासाठीही साथ सोडली नाही.....................102
- अमिता अजीत पारेख.................................102

२०. माताजी सर्व सांभाळून घेतील.................................110
- जयंतीलाल तसेच श्रीमती कमला ठक्कर......110

## करुणा शांतीच्या दूत माताजी : निरोप

१. एक आदर्श आई.................................113
- नयना श्रीप्रकाश गोयंका.................................113

२. आता केवळ स्मृती शिल्लक आहेत.................................117
- जगदीशकुमारी रामसिंह चौहान.......................117

३. काही महत्वपूर्ण आठवणी ........ 119
- अंजू आणि नरेश अग्रवाल ........ 119
४. आम्ही कृतज्ञ आहोत ........ 121
- सुशीला रामअवध वर्मा ........ 121
५. माताजींचे संस्मरण ........ 123
- सुमन श्रीराम तापडीया ........ 123
६. माताजींचा स्नेहाशिष ........ 125
- रामप्रसाद रामदेव यादव ........ 125
७. माताजींचे अमूल्य मार्गदर्शन ........ 130
- मंजू महासुख खंधार ........ 130
८. काय, खरंच माताजी नाहीत? ........ 132
- सुश्री प्रीती डेढिया ........ 132
९. करुणा-शांतींच्या दूत माताजी: निरोप ........ 139
- डॉ. ओम दत्त त्रिपाठी ........ 139
**विपश्यना साधना केंद्र ........ 144**

# प्रास्तविक

साधिका सज्जनबाई प्रमाणे अनेक साधक-साधिकांच्या मनात हे द्वंद्व चालू राहिले असेल आणि आजही असू शकते की शिकवणारे तर पूज्य गुरुजी आहेत आणि माताजी तर बस्स गुपचूप बसून राहतात. कालांतराने पूज्य माताजींच्या जवळ येण्यामुळे साधिकांचा हा भ्रम दूर होत गेला. या शंकेचे समाधान एका मुलाखतीत पूज्य माताजींनी स्वतः केले आहे. त्या म्हणतात– मी जास्त बोलत नाही कारण मी या सत्याविषयी सदैव दक्ष राहते की कोठे काही चुकीचे तर होणार नाही ना. बालपणापासूनच माझा असा स्वभाव आहे की जो विषय अनेक लोकांशी संबंधित आहे त्याबद्दल मी कमीच बोलते. केवळ पाहणे हे त्याच्यापेक्षा चांगले आहे. सक्रीय भाग घेऊन चर्चा करत राहण्यापेक्षा चौकस राहणे अधिक चांगले आहे. मौन राहून पाहणेच तर विपश्यनेचा मूळ मंत्र आहे, त्याला पूज्य माताजींनी बालपणापासूनच पकडून ठेवले होते.

या मुनी माताजींच्या भूमिकेचा परिचय करून देण्याचा श्रद्धेय सत्येंद्रनाथ टंडनजींचा प्रयत्न स्तुत्यच आहे. त्यांनी माताजींच्या निकट असणाऱ्या अनेक साधकांकडून त्यांच्याविषयींचे लेख, आठवणी लिहून पाठविण्यास सांगितल्या. त्या सर्व माताजींच्या जीवनकाळातच एकत्र केल्या गेल्या. या कार्यात वीस साधिकांनी सहकार्य केले, त्यात एक-दोन पुरुषही आहेत. काहींनी पूज्य माताजींचे देहावसान झाल्यानंतर लिहून पाठविले. मध्यंतरीच्या काळात पूज्य माताजींना पूज्य गुरुजींनी संबोधित, प्रेषित केलेल्या काही प्रेरणाजनक पत्रांच्या प्रतिलिपी प्राप्त झाल्या. त्या पूज्य गुरुजींनी १९६९-७० मधे भारतात आल्यानंतर लिहिल्या होत्या. या पत्रांमध्ये माताजींनी परिवाराची आणि मुलांच्या भविष्याची काळजी व्यक्त केली, तेव्हा त्या पत्रांना पूज्य गुरुजींनी धर्मपूर्वक उत्तरे देऊन निश्चिंत राहण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांचे मार्गदर्शन साधिकांना, वाचकांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे. ही पत्रे सर्वांना धर्ममार्गावर विश्वास ठेवून आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी प्रेरित करतात. वेळ आल्यावर सर्व बाधा दूर होतात आणि जीवनाची उजळ

बाजू आपोआप उजेडात येते.

१९६९ मध्ये पूज्य गुरुजींना परमपूज्य दादा गुरुजीं (सयाजी ऊ बा खिन) द्वारे आचार्य पदावर प्रतिष्ठीत केल्यानंतर ते एकटेच भारतात आले होते. आपल्या पहिल्या संक्षिप्त पत्रात त्यांनी केवळ धर्माच्याच गोष्टी केल्या आहेत. परंतु नंतरच्या पत्रात धर्म आणि प्रपंच या दोन्हींची चर्चा केली आहे. ते गृहस्थ आचार्य होते, म्हणून असे करणे योग्यच होते. धर्माच्या संबंधात त्यांनी मुख्यतः या तीन बाबी लिहिल्या आहेत – १) एकतर देवी इलायचींनी आश्रमात जाऊन विपश्यनेचा अभ्यास सुरु ठेवावा. २) लवकरच भारतात येऊन धर्मदानात सहयोग देण्यासाठी तयार राहावे आणि ३) बर्मामध्ये राहणाऱ्या परिवाराचा साधना-अभ्यास चालू ठेवावा. प्रपंचाबाबत परिवारातील सदस्यांचे स्वास्थ्य, शिक्षण आणि जे मोठे झाले आहेत त्यांच्यासाठी रोजगार आणि व्यवसाय इत्यादी व्यवस्थांचा उल्लेख केला आहे.

भारतात आल्यानंतर दहा दिवसांच्या आतच पूज्य गुरुजींनी मुंबईमध्ये पहिले शिबिर घेतले. त्यानंतर भिन्न भिन्न क्षेत्रातून शिबिरांची मागणी येऊ लागली. येथे पूज्य गुरुजींनी प्रथम धर्मकार्याला प्राधान्य दिले आणि जेव्हा शिबिर नसेल तेव्हा मुलांसाठी रोजगार, व्यवसायासाठी थोडासा वेळ देण्याचा प्रयत्न करीत राहिले. या प्रकरणाला ‘माताजींच्या प्रति गुरुजींचे उपदेश’ यात समाविष्ट केले आहे.

साधिकांकडून प्राप्त झालेल्या लेखांना, आठवणींना ‘धर्मयानाचे दुसरे चक्र’ असे शीर्षक दिले गेले आहे. पूज्य माताजी मुंबईला येण्यापूर्वी जे धर्मयान केवळ एकाच चाकाच्या (गुरुजींच्या) आधाराने चालत होते आता ते त्यांच्या येण्यामुळे दोन चाकांवर चालू लागले. धर्मामधील माताजींच्या योगदानाला साधिकांनी निरनिराळ्या दृष्टीकोनातून प्रकट केले आहे, जसे– कुशल गृहिणी, करुणामयी आई, करुणा-मैत्रीचे भांडार, सजगता-समतेची मूर्ती, आदर्श दाम्पत्य, पायाची वीट, उचित परामर्शदात्री, दानशूर... इत्यादी. काहीजणी तर त्यांच्या गुणांनी इतक्या प्रभावित झाल्या की अंतर्मनातील भाव अनेक प्रकारे व्यक्त करुन त्यांना वारंवार प्रणाम करीत राहिल्या. त्यांच्यानुसार माताजींनी क्षणभरदेखील

गुरुजींची साथ सोडली नाही आणि संकटाच्या वेळी भक्कमपणे उभ्या राहिल्या. एका साधक दाम्पत्याने तर पू. गुरुजी आणि पूजनीय माताजींच्या आपसातील विचार-विमर्शांना लक्ष्य करुन म्हटले– गुरुजी नसतील तेव्हा माताजी आम्हाला निर्देश आणि मैत्री देत राहतील. खरोखर पू. गुरुजींच्या देहत्यागानंतर अडीच वर्षांपर्यंत पू. माताजीच विपश्यना कार्यक्रमांचे संचालन करीत राहिल्या. त्या पाच डिसेंबर २०१५ ला ऑपरेशनसाठी हॉस्पिटल मध्ये दाखल झाल्या आणि ५ जानेवारी २०१६ ला त्यांनी देहत्याग केला. या प्रसंगाचे उद्गार 'करुणा-शांतीची दूत : निरोप' या प्रकरणात आलेले आहेत.

धर्म प्रसाराबाबतीत पूजनीय माताजीसंबंधी जी काही माहिती उपलब्ध झाली आहे त्याला हिमनगाचा सिद्धांत (आईसबर्ग थेअरी) च्या रुपात समजले पाहिजे ज्याचा केवळ एक भाग पाण्याच्या वर दिसून येतो आणि बाकीचा नऊ भाग पाण्याच्या खाली असतो, ज्याला आपण पाहू शकत नाही.

धर्मदानाने प्राप्त होणाऱ्या पुण्याविषयी पू. माताजींना पू. गुरुजी लिहितात – "आपला संबंध न जाणे कितीतरी जन्मांचा आहे... बरोबरच सुख-दुःख भोगले आहे आणि पुण्य कमविले आहे. या जन्मात पुन्हा आपण सोबत आहोत". आता मला केवळ आशाच नाही तर पूर्ण विश्वास आहे की पुढच्या जन्मात आपण दोघेही भारतात पुन्हा जन्म घेऊ आणि अनेक जन्मात प्राप्त केलेल्या पुण्याच्या आधारावर विपश्यना-कार्याला त्याच्या अत्युच्च उंचीपर्यंत पोहोचवताना अनेक दुःखी लोकांचे दुःख दूर करण्यात सहायक होऊ.